# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

## (महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल)

## सूचना

क्रमांकः- नरवि/कावि/०९/२४२/२०१९.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची सूधारित विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्रः- टीपीएस-१८९३/१४१२/नवि-१३, दिः- २८/११/१९९५ अन्वये मंजूर झाली असून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्रः- पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.-८९/नवि-२२, दिः- १५/११/१९९७ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे नियोजन नियंत्रणाखालील काही क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली समाविष्ट करण्यात आले आहे. (यापुढे " उक्त विकास योजना" म्हणून संबोधित केलेली)

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे - वाकड येथील स.नं. २१० मध्ये पूर्व-पश्चिम २४ मी. रूंदीचा रस्ता प्रस्तावित करणेत आलेला आहे. ( यापुढे " उक्त रस्ता " म्हणून संबोधित केलेला)

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील मौजे - वाकड येथील स.नं. २१०/३ पैकी मधील उक्त रस्त्यापैकी सुमारे ९५ मी. लांबीचा रस्त्याचा भाग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणात समाविष्ट झालेल्या क्षेत्रातील आहे. ( यापुढे " उक्त जमीन" म्हणून संबोधित केलेली)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्र. ४०१, दिः- ०६/०६/२०१९ अन्वये पारीत केलेल्या ठरावात उक्त विकास योजनेतील उक्त जमिनीमधील २४ मी. रुंदीचा उक्त रस्ता रद्द करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यासंबंधीचा विषय असून त्यास मान्यता प्रदान केलेली आहे. (यापुढे "उक्त ठरावातील विषय" म्हणून संबोधित केलेला)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त जमिनीतील २४ मी. रुंदीचा उक्त रस्ता रद्द करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची विहीत कार्यवाही उक्त ठरावातील विषयानुसार करण्याचे योजिले आहे. ( यापुढे "उक्त फेरबदल" म्हणुन उल्लेख केलेला)

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल प्रस्ताव दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

**PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION,**

**Modification under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966**

**Notice**

No. TPS/WS/09/242/2019.

Whereas, the Development Plan of Pimpri Chinchwad New Town Development Authority has been sanctioned by Government of Maharashtra, Urban Development Department vide Notification No.TPS-1893/1412/UD-13,dt.18/11/1995 and some area under the planning control of Pimpri Chinchwad New Town Development Authority has been included under the planning control of Pimpri Chinchwad Municipal Corporation vide Notification No. PCN-1697/934/CR-89/UD-22,dt. 15/11/1997.(hereinafter referred to as the "said Development Plan")

And Whereas, in the said Development Plan 24 m wide East-West road is proposed in S. No. 210 of Village Wakad. ( hereinafter referred as to as the "said Road")

And whereas, the part of the said Road having length about 95 m from S. No. 210/3 of village Wakad from the said Development Plan is from the area which came under the planning control of Pimpri Chinchwad Municipal Corporation. ( hereinafter referred as the "said Land")

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has passed the resolution vide Resolution No: 401, dated 06/06/2019 to initiate the modification in the said Development Plan, as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to delete the said Road of 24 m width from the said Land which is the subject of this resolution. (hereinafter referred to as the "subject of the said Resolution")

And whereas, as per the subject of the said Resolution, the Municipal Corporation intends to initiate the modification procedure in the said Development Plan as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to delete the said road of 24 m width from the said Land. ( hereinafter referred to as the "said Modification")

And therefore, the copy of plan showing the said modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune - 411 018 .

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदलाचा नकाशा
(मौजे -वाकड येथिल स.नं. २१०पै. हिस्सा नं. ३ मधिल २४.०० मी. विकास योजनेतील रस्ता रद्द करणेचा प्रस्तावित फेरबदल)

24 m. D.P. Road
Proposed to be deleted.




(प्रमाण –१:५०००)

खुलासा:-

मंजूर विकास योजना रस्ते / रस्तारुंदी

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव असे.

(मौजे - वाकड येथिल स.नं. २१०पै. हिस्सा नं. ३ मधिल विकास योजनेतील २४.०० मी रस्ता रद्द करणे प्रस्तावित असे.)

उपसंचालक,नगररचना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे –४११०१८

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे –४११०१८